Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 748 – 752
DOI: 10.5281/zenodo.10279529

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे जीवनविषयक तत्वज्ञान व त्यांच्या विचारांचे सारसंग्रह –एक अभ्यास

प्रा. डॉ. रसाळ दशरथ किसन

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, रयत शिक्षण संस्थेचे, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर ४१३००१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: rasaldk@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्रलढ्याचा अभ्यास करताना आपणास एकूण तीन कालखंडाचा अभ्यास करावा लागतो.त्यामध्ये १८८५-१९०५ मवाळमतवादी कालखंड म्हणजेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची झालेली स्थापना होय.त्यानंतर जहालमतवादी कालखंड १९०५-१९२० या 'कालखंडाला ''टिळकयुग' असे म्हटले जाते.व शेवटी १९२० ते १९५० पर्यंतचा कालखंड याला 'गांधीयुग'म्हटले जाते.याच काळात १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र मिळाले.या कालखंडाचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले होते. भारतीय स्वातंत्रलढ्याची सुरुवात खरे तर १८ व्या शतकातच झालेली होती. बंगालमधील समाजसुधारक राजाराम मोहन रॉय यांनी राष्ट्रवादाची सुरुवात करून प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वतःच्या राष्ट्राविषयी भावना निर्माण केली. व ख-या अर्थाने राष्ट्र, राज्य, व देश ही संकल्पना स्पष्ट झाली.१९१४-१५ पासूनच महात्मा गांधी यांनी आपल्या नेतृत्वाने सबंध भारतीय स्वातंत्रलढ्याचे नेतृत्व केले. आणि त्यांनी आपल्या राजकीय तत्वज्ञानाने सर्वांना एकत्र करून सत्य अहिंसा व सत्यागृह या शस्त्राने भारताला स्वातंत्र मिळऊन दिले.तसेच क्रांती कारकानी आपल्या बलिदानाने भारत मातेला परकियांच्या जोखडातून मुक्त केले.यामध्ये महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान जगाला एक आदर्शवत तत्वज्ञान आहे. म्हणूनच त्यांच्या या विचारातून प्रेरणा घेऊन भावी पिढ्यांनी वाटचाल करावी हाच या शोधनिबंधांमागचा उद्देश आहे.

## घोषवारा

महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान व त्यांच्या विचाराचे सार पाहताना आपणास त्यांची विचारसरणी कीती मोठी होती हे दिसून येते.स्वातंत्रलढ्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष्या निमित्त त्यांच्या विचाराची आठवण येते.त्याचे कारण म्हणजे त्यांचे विचार त्याकाळी किती महत्वाचे होते.परकीय सत्तेच्या जोखडातून भारताला मुक्त करणे. हे एक मोठे आव्हानच होते.मात्र महात्मा गांधीजीनीनी आपल्या सत्य,अहिंसा व सत्यागृह या अस्त्राने भारताला स्वातंत्र मिळऊन दिले. ही गोष्ट प्रेरणादायी आहे.या त्यांच्या कार्यामुळे सत्य व अहिंसेची ताकत जगाला कळली. व महत्मा गांधीजीचे तत्वज्ञान जगाला समजले.व

अहिंसेत सुद्धा किती मोठी ताकत असते.याची माहिती पारतंत्र्यात असलेल्या देशांना लक्ष्यात आली.यातच महात्मा गांधीजीच्या कार्याचे दर्शन होते.म्हणूनच त्यांचे विचार व तत्वज्ञान आजही प्रेरणादायी आहेत. याची सर्वाना ओळख व्हावी.हीच अपेक्षा आहे.

**महात्मा गांधी यांच्या जीवनाचे तत्वज्ञान**

महात्मा गांधीजीचे जीवनविषयक तत्वज्ञान व त्यांच्यावर झालेले संस्कार ,त्यांना आलेले अनुभव,हिंदू धर्म ग्रंथ व वेगवेगळया धर्माचा अभ्यास या सर्वांचा परीपाक म्हणजे गांधीजीचे जीवनविषयक तत्वज्ञान होय.त्यांनी सर्व धर्माचा सखोल अभ्यास केला.Tolstoy यांच्या The kingdom of God is with in you' या ग्रंथाचा आणि रस्किन यांच्या 'un to this last' या ग्रंथातील तत्वज्ञानाचा त्यांच्यावर विलक्षण असा परिणाम झाला होता.१ जसे की लो. टिळकांनी भगवतगीतेच्या परिशीलनाने कर्मयोग शोधून काढला.त्याच प्रमाणे महात्मा गांधीजीनी भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणुकीतून अनासाक्तीयोगाचा आपणास साक्षात्कार झाल्याचे सांगितले आहे.

**महात्मा गांधीजीच्या तत्वज्ञानाची त्रिसूत्री व शिक्षणाचे मूल्य**

महात्मा गांधीजीच्या जीवनाच्या तत्वज्ञानातील त्रिसूत्री म्हणजे सत्य,अहिंसा व सत्यागृह प्रेम होय.त्यांच्या मतानुसार सत्य हेच जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे.परमेश्वर म्हणजे सत्य होय.अशी त्यांची खात्री होती.त्यांच्या मते,वाईटावर विजय मिळविण्यासाठी चांगल्याचा उपयोग झाला पाहिजे.सत्य आणि अहिंसा या मध्ये ते फरक करीत नसत.सत्य आणि अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रेम हाच गांधीजीचा धर्म होता.जनसेवा हीच ईश्वरसेवा असे ते नेहमी मानत असत.निसर्गवाद,आदर्शवाद, वास्तववाद, व कार्यवाद असे चार पंथ महत्वाचे वाटतात.२ शिक्षणाने गतिशील समाजाच्या गरजा लक्षात घेतल्या पाहीजे. व सामाजिक,आर्थिक बदल घडून येत असलेल्या समाजापासून शिक्षण दुर राहू शकत नाही.जे शिक्षण चारित्र निर्माण करू शकते ते सर्वोच्च शिक्षण होय. व्यक्तीचा विकास करते ते शिक्षण होय.यामुळेच त्यांनी शिक्षण क्षेत्राला खूप मोठी देणगी दिली. म्हणूनच जीवनाच्या तत्वज्ञानाची कसोटी शिक्षणाच्या निकषांवर घासून पाहिली होती. यातच त्यांचे तत्त्वज्ञान उद्धृत झाल्याचे दिसून येते.

**प्रार्थना हे आत्मशांतीचे एक अमोघ साधन**

महात्मा गांधीजीच्या सर्वांग परीपूर्ण जीवनाचे अंग प्रार्थना हे होते.विश्वातील सर्व धर्माच्या मौलिक एकते विषयी त्यांच्या मनात आस्था होती.म्हणूनच सर्व धर्मग्रंथातील सार त्यांच्या प्रार्थनेत होते.म्हणून कोणतीही गोष्ट ते प्रार्थनेशिवाय करीत नसत.ही त्यांच्या जीवनातील विशेष बाब होती.म्हणून ते नेहमी म्हणत असत.'प्रार्थना ही सकाळची किल्ली आणि संध्याकाळचे कुलूप आहे.३ प्रार्थनवाचून जीवन त्यांना उदास व रिते-रिते वाटत असे. म्हणून प्रार्थना हे आत्मशांतीचे अमोघ असे साधन होते.हे त्यांनी आयुष्यभर जपले. त त्याबरोबरच त्यांनी म्हणूनच रामराज्याची व ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली.

**आश्रम ही महात्मा गांधीजीची एक प्रयोगशाळा**

आश्रम ही महात्मा गांधीजींची एक प्रयोग शाळा असून तेथे त्यानी कृती आणि प्रयोग यांच्या रूपाने शिकविले.यात स्वावलंबन हे महत्वाचे होते. भारतातील शेतक-याना काम मिळत नाही. हे त्यांनी पाहिले होते. त्यांना जनतेची गरिबी माहित होती.त्यांना कोणते तरी काम द्यावे. या दृष्टीने ते विचार करीत होते. त्यांनी सूतकताई सारख्या एका साध्या कलेचा विचार केला. आणि हे साधे पण अतिशय उपयुक्त यंत्र आश्रमवासीयांच्या हाती दिले. व अर्धपोटी व अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांना खादीचे काम देऊ शकले. स्त्रियांनी सूतकताई करून खादी विणून भारतीयांना कापड पुरवावे अशी

त्यांनी योजना मांडली.४ सुतकताई हा सर्वात सोपा, स्वस्त, व उत्तम उद्योग आहे..तो आपणाला स्वावलंबी बनवील. व लोकांना खादी वापरण्याची संवय झाली तर दरवर्षी 60 कोटी रुपयाची बचत होईल. अशी त्यांनी व्यवस्था केली. त्यांनी अनेक वेळा सांगितले की, खरा भारत हा शहरात नाही तर तो खेड्यात आहे.यातून त्यांनी स्वदेशीचा संदेश दिला.

**महात्मा गांधीजींचा सत्य, अहिंसा व सत्याग्रह हा रचनात्मक कार्यक्रम**

ईश्वर एक आहे. हे तत्व सर्व धर्मात सामान आहे.हे तत्व प्रार्थनेनेच प्राप्त होते. सत्य व अहिंसा हा खरा धर्म आहे.अहिंसा ही सत्याच्या पोटात असते. असे मानून महात्मा गांधी यांनी ‘ सत्याचे प्रयोग’ करीत राहिले. आणि सत्याग्रहाचा मार्ग बळकट करीत राहिले. वैयक्तिक सत्याग्रह आणि सामुदायिक सत्याग्रहाला त्यांनी महत्व दिले. त्यांचा अस्पृश्यतेला विरोध होता.अस्पृश्यांचा उद्धार झाला पाहिजे.अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे. म्हणून त्यांनी विधायक कार्यक्रमाद्वारे चळवळ केली. अस्पृश्यना अस्पृश्य न म्हणता त्यांनी हरिजन म्हटले. या बरोबरच त्यांनी एकीकडे राजकीय स्वातंत्र लढ्याचे नेतृत्व केले. तर दुसरीकडे समाजाला विधायक कार्यक्रम दिले. सत्य व अहिंसात्मक साधनांनी स्वराज्याची रचना करणे. म्हणजे विधायक कार्यक्रम होय. हाही महात्मा गांधीजीचा ‘सत्याचा प्रयोग'होता या प्रयोगामध्ये जातीय ऐक्य, हिंदू -मुस्लीम ऐंक्य,खादीप्रसार,अस्पृश्यता निवारण करणे होय. महात्मा गांधीजींचे जीवन म्हणजे शुद्धचारीत्र्य, स्वावलंबन व साधेपणा हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्टे होते.ब्रह्मचर्याचे पालन करावयाचे असेल तर स्वइंद्रियावर ताबा मिळविलाच पाहिजे. स्व जिंकला तर ब्रह्मचर्य अतिशय सूलभ आहे. याचा स्वतः मी अनुभव घेतला आहे. असे ते म्हणत असत .आहाराचा ब्रह्मचर्यावर किती व कसा परिणाम होतो. या बाबतीत पुष्कळ प्रयोगाची आवश्यकता आहे.८ अशी गांधीजींच्या जीवनातील ब्रह्मचर्याची कल्पना होती. त्यांनी अनेक धर्मग्रंथाचा अभ्यास केला. व त्यातून त्यांनी धर्मजागृती केली. त्यांना शाळेत कोठेही धर्माचे शिक्षण मिळाले नाही. तरी पण त्यांनी अनेक अनुभवातून धार्मिक शिक्षण घेतले. येथे त्यांनी धर्माचा व्यापक अर्थ घेतला आहे. धर्म म्हणजे आत्मभान -आत्मज्ञान होय.९ ते म्हणतात की, माझा जन्म वैष्णव संप्रदायात  झालेला आहे. पण माझ्या मनावर सर्वात जास्त परिणाम रामायणाचा झाला पोरबंदर ला असताना रोज रात्री मी रामाच्या मंदिरात रामायण ऐकत असत.तसेच गांधीजीची आई ही रामाची भक्त होती.आपल्यावर कोणतेही संकट आले तर फक्त ‘श्रीराम’ म्हणावे अशी त्यांना आईने शिकवण दिली होती.म्हणूनच ते शेवटपर्यंत श्रीराम भक्त असल्याचे दिसून येतात.अशा रीतीने इ. धर्माबद्दल माझ्या मनात समभाव उत्पन्न झाला होता. अशी त्यांची धर्माविषयीची आस्था होती.

**स्वातंत्र लढयाची संकल्पना**

स्वातंत्र लढ्यातील एक दिव्य पर्व म्हणजे १९३० मध्ये महाराष्ट्रातील विविध शहरात संघर्ष सुरू झाला.त्यापैकी सोलापूर हे एक केंद्र होते. तेथे इंग्रजांनी मार्शल law पुकारला होता. त्याचे लोन देशाच्या  विविध भागात उमटले. व त्यातच तरुण वर्ग आपल्या प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र लढा जिंकायची तयारी करू लागला. या तरुणाला स्वातंत्र लढ्याची संकल्पना आणि माध्यमे लो.टिळक व महात्मा गांधीजींनी दिली. स्वदेशी, बहिष्कार, सविनय कायदेभंग ,राष्ट्रीय शिक्षण, सत्यगृह, मोर्चे, मिरवणुका, हरताळ, आत्मबळ, वाढविण्यासाठी उपोषण आदी माध्यमे, लढ्याची ताकत व व्याप्ती वाढऊ लागले.१० व त्यातून संघर्ष तीव्र होत चालला. प्रत्येक गाव व शहर संघर्ष्याचे केंद्र झाले.५ मे १९३० ला महात्मा गांधीजींला अटक होताच सारा समाज अश्वस्त झाला.यातूनच सोलापूरचे चार हुतात्मे शहीद झाले.या घटनेचा खूप मोठा प्रभाव पडला.

हिंदुस्तानातील एकजूट निर्माण करण्यासाठी गांधीजीने आपले लक्ष दलितांकडे वळविले' 'हरिजन' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. अस्पृश्यासाठी देवालये, विहिरी मोकळया करण्याची, शाळा उघडन्याची एकच मोहीम निघाली.'अखिल भारतीय हरिजन सेवक संघ'स्थापन करण्यात आला.११ त्यांनी सामाजिक, राजकीय, व धार्मिक या तिन्ही चळवळीत पुढाकार घेतला. तसेच महात्मा गांधी यांनी दक्षिण अफ्रिकेत आपले आत्मबल व आत्मतेज याचा परिचय करून दिला.त्यांनी दुर्बल महिलांना सुद्धा सविनय कायदेभंगात महत्वाची भूमिका पार पाडायची आहे. असे आव्हान केले. अशा प्रकारे वर्ण भेदाविरुद्ध लढण्याची शक्ती साऱ्या दक्षिण अफ्रिकेतील भारतीयात निर्माण केली.१२ त्यामुळे तेथील भारतीय समाज तर संघटित झाला. परंतु त्याचा परिणाम कित्येक गोऱ्या अधिका-यावही झाला.

म्हणूनच गत काळातील असामान्य व्यक्ती म्हणून महात्मा गांधीचा अभिमान सर्व भारतीयांना वाटणे साहजिक महत्मा गांधीजीचे कार्य अफाट होते. हातातील केवळ काठी सोडली तर गांधीजी निशस्त्र होते. परंतु त्यांच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास होता. त्यांची अहिंसेवर दृढ श्रद्धा होती. सत्यागृह हे प्रभावी शस्त्र त्यांनी शोधले.१३ व त्याचा त्यांनी वापर ब्रिटिशाची सत्ता खाली खेचण्यासाठी साठी केला. त्यांच्या या कार्यात त्यांची धर्म पत्नी कस्तुरबा उर्फ' बा 'यांनी त्यांना खूप मदत केली. त्यांनी विविध आंदोलनात सहभाग घेतला.

**विषयाची व्याप्ती**

विषयाची व्याप्ती पाहताना आपणास भारतीय राजकारणात महात्मा गांधीजीचे कार्य अफाट असलेले दिसून येते. म्हणूनच त्यांच्या कार्याला भारतीय स्वातंत्रलढ्यात खुप महत्वाचे स्थान आहे.त्यांच्या कार्याची ओळख खूप मोठी आहे. म्हणूनच त्यांनी जे कार्य केले आहे ते खूप व्यापक स्वरूपाचे असल्याचे आपणास दिसून येते.

**संशोधनाची उदिष्टे**

१. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.व त्यातून भारताचा स्वातंत्रलढा अभ्यासणे.
२. भारतीय राजकारणातील महात्मा गांधीजींचे कार्य अभ्यासून त्यांचे विचार कृतीत आणणे.
३. महात्मा गांधीजीच्या सत्य,अहिंसा व सत्याग्रह या त्रिसूत्रीचा उपयोग कसा झाला याचा भावी पिढीने उपयोग करणे.
४. महात्मा गांधी यांच्या व्रतस्थ जीवनातून उद्याचा भारत निर्माण करणे.
५. भारतीय स्वातंत्रलढ्यातील गांधीयुगाचे वैशिष्ठये विचारात घेऊन त्यांचे स्थान कसे होते याची चिकित्सा करणे.
६. महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान व त्यांच्या विचाराचे सारसंग्रह पाहणे ही काळाची गरज आहे.
७. महात्मा गांधी यांचे अस्पृश्यता निवारणातील कार्य व धार्मिक जीवन पाहणे.
८. महात्मा गांधीजींच्या जीवनाचा जगावर कोणता प्रभाव आहे. याचा शोध घेणे.

**संशोधनाची पद्धती**

वरील शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष**

महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्रलढ्याचे नेतृत्व केले. हे सर्वज्ञात आहे. त्यामुळे गांधीजींचे नाव जगात आहे. आजही भारताची ओळख दोन महात्म्याने होते. त्यामध्ये तथागत गौतम बुद्ध व महात्मा गांधी याची कीर्ती आजही सर्वाना ज्ञात आहे. त्यांच्या मृत्यू नंतरही त्यांचे तत्वज्ञान व त्यांचे ऐतिहासिक कार्य अजरामर आहे. आजही अनेक देशात

त्यांच्या या अलौकिक कार्यावर संशोधन होत आहे. याचा आपणास भारतीय म्हणून अभिमान आहे. महात्मा गांधीजीचा देश म्हणून अनेक लोक भारताला भेट देतात. त्याचे कारण म्हणजे त्यांनी या देशाला परकीय सत्तेच्या जोखडातून १५ ऑगस्ट १९४७ साली मुक्त केले. हे त्यांच्या कार्यातून दिसून येते. तेव्हा या त्यांच्या विचाराची  व त्यांनी केलेल्या कार्याची उद्याच्या पिढीने स्मृती जतन करावी.व भारताची प्रतिमा जपावी हीच सर्व भारतीयाकडून अपेक्षा आहे.

**संदर्भ सूची**


१. भगत रा. तू - शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती २००९ पृ. क्र. ९९.

२. उपरोक्त - पृ. क्र. १००

३. उपरोक्त पृ.क्र. १०१

४. वडेर प्रल्हाद - महात्मा गांधी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे द्वितीय आवृत्ती-2006 पृ.क्र. ३७

५. उपरोक्त - पृ.क्र. ६५

६. कऱ्हाडे सदा - समाजप्रबोध, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती-२०११ पृ.क्र. ६

७. उपरोक्त पृ. क्र. ९६

८. गांधी मोहनदास करमचंद - सत्याचे प्रयोग (आत्मकथन)रिया पब्लिकेशन, कोल्हापूर-२०१३ पृ. क्र. २१४

९. उपरोक्त - पृ.क्र. ४४

१०. पुंडे नीलकंठ - मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे - २०१८ पृ.क्र. १

११. केतकर कुमार - कथा स्वातंत्र्याची म.राज्य पाठयपूस्तक मंडळ, पुणे, विशेष आवृत्ती २०१० पृ. क्र. २३२

१२. लिमये मधू - स्वातंत्र चळवळीची विचारधारा, भारतीय मुद्रणालय, कोल्हापूर २०१८ पृ. क्र. ११२

१३. भराडे संध्या - मी कस्तुरबा, ज्ञानेश प्रकाशन नागपूर २०२१ पृ. क्र. ४३

१४.कठारे अनिल - महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स औरंगाबाद प्रथमावृत्ती, २०१४ पृ.क्र. २१४